महाराष्ट्र शासन
कार्यालय पोलीस आयुक्त, नागपूर शहर, पोलीस भवन, वेस्ट हायकोर्ट रोड,
सिव्हील लाईन्स, नागपूर.
दुरध्वनी क.0712–2590601 cp.nagpur@mahapolice.gov.in

कमांक : पोआना / परवाना / पली–4 / ब्लास्टींग नाहप्र / 1550 / 2026 नागपूर, दिनांक : 03 / 02 / 2026

## –: ना–हरकत प्रमाणपत्र :–

विषय :– माधव नेत्रालय, हिंगणा रोड, नागपूर येथील प्रस्तावित धर्माथ दवाखान्याचे इमारतीचे तळघर पायाचे व (फॉन्डेशन) खोदकाम करण्याकरीता कंट्रोल ब्लास्टिंगची परवानगी मिळणे बाबत....

संदर्भ :– आपले दिनांक 22 / 12 / 2025 चे पत्र......

000

उपरोक्त संदर्भाकिंत विषयाचे अनुषंगाने, माधव नेत्रालय आय इंस्टीटयूट ॲन्ड रिसर्च सेंन्टर खसरा नं. 7 सिटी सर्वे नं. 6 मौजा जयताळा, हिंगणा रोड, नागपूर नविन हॉस्पीटल इमारत बांधकाम करणार असून सदर जागेवर कंट्रोल्ड ब्लॉस्टींगची परवानगी मिळण्याकरीता या कार्यालयात अर्ज सादर केलेला आहे.

ज्याअर्थी सदर ब्लॉस्टींगच्या परवानगी करीता वरीष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन एमआयडीसी व पोलीस उपआयुक्त, परिमंडळ–1, नागपूर शहर यांचेकडून अहवाल मागविण्यात आलेला असता त्यांनी त्यांचे अहवालात कंट्रोल ब्लास्टींग चे काम करतेवेळी विस्फोटक अधिनियम 2008 चे नियम 98 अन्वये विस्फोटक नियंत्रक यांनी नियुक्त केलले शार्ट फायरर हे स्वतः हजर राहून वैद्य प्रमाणपत्र धारण करणा–या शार्ट फायरर कडून विस्फोट करणे गरजेचे आहे. व शाट फायरने वैद्य प्रमाणपत्र जवळ बाळगने आवश्यक आहे. कंन्ट्रोल्ड ब्लॉस्टींग करण्यापूर्वी आसपासच्या परीसरातील व येणारे जाणारे प्रवासी, पादचारी यांचे जिवितास व मालमत्तेस तडा, क्षती, हानी, नुकसान होणार नाही याची खात्री करून चारही बाजूस स्वःताचे गार्ड नेमून त्यांच्या हाती लाल रंगाचे झेंडे देवून दर्शनिय ठिकाणी नियुक्त करून समोर धोका आहे असे निदर्शनास आणून देतील अशा पध्दतीने दर्शनिय ठिकाणी नियुक्त करावे. शार्ट फायरर विस्फोट करण्यापूर्वी रबर मॅट, लोंखडी चादर व रेतीने भरलेल्या बॅगा व्यवस्थीत ठेवून स्तःता खात्री करून विस्फोट करावा. कंन्ट्रोल्ड ब्लॉस्टींगची सर्व जबाबदारी ही परवाना धारक 1) श्री. महादेवराव धोंडबाजी मडावी, 2) श्री. मनोज केक्त्ती, 3) श्री. प्रशांत रविंपळसापूरे तसेच माधव नेत्रालय आय इंस्टीटयूट ॲन्ड रिसर्च सेंन्टर नागपूर यांची राहील.

त्याअर्थी याद्वारे दिनांक 04 / 02 / 2026 ते 03 / 08 / 2026 **(सहा महीने)** या कालावधीमध्ये कंट्रोल्ड ब्लास्टींग करण्याकरीता सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून विस्फोटक नियम, शॉट फायर परमिट मधील अटी व शर्तीचे तसेच खालील अटींचे अधिन राहून परवानगी देण्यात येत आहे.

अटी :–

1. ब्लॉस्टींग परवाना / शॉट फायरर परवाना धारकाकडूनच प्रस्तावित ठिकाणी ब्लॉस्टींग करणे बंधनकारक आहे. वैध ब्लॉस्टींग परवाना / शॉट फायरर परवाना जवळ बाळगणे आवश्यक आहे.
2. संबंधीत स्थानिक संस्था व पोलीस स्टेशन यांना ब्लॉस्टींग बाबत सुचना देण्यात यावी.
3. ज्या परिसरात ब्लॉस्टींग करण्यात येणार आहे तेथील परिसरातील नागरीकांना ब्लॉस्टींग करण्यापूर्वी सुचीत करण्यात यावे.
4. ब्लॉस्टींग दरम्यान सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाय योजना करणे बंधनकारक राहील.

मागे पहा.....

5. ब्लॉस्टीग करतेवेळी कोणत्याही प्रकारचा धोका/नुकसान होणार नाही याची खबरदारी घ्यावी.

6. विस्फोटक तज्ञ चमुचे निरीक्षणातच भूसुरंग (ब्लॉस्टींग) उडवावे.

7. विस्फोटकाचा गैरवापर होणार नाही याची दक्षता बाळगावी.

8. सदर ब्लॉस्टींगमुळे कोणत्याही प्रकारची जिवहानी, वित्तहानी होणार नाही याची दक्षता घ्यावी तसेच कोणताही प्रकारचा धोका/नुकसान झाल्यास आवेदक स्वतः जबाबदार राहील. प्रस्तावित ब्लॉस्टींग ठिकाणी रबर मॅट, लोखंडी चादर, व रेतीने भरलेल्या बॅगा व्यवस्थीत ठेवून स्वतः खात्री करुन कंट्रोल ब्लॉस्टींग ठिकाणाच्या आजुबाजुला जास्तीत जास्त सुरक्षा रक्षक नेमुन आसपासच्या परिसरातील व येणारे जाणारे प्रवासी, पादचारी यांचे जिवींतास व मालमत्तेस क्षती, हानी, नुकसान होणार नाही याची दक्षता घेवून कंट्रोल ब्लॉस्ट करण्यात यावा.

9. कंट्रोल ब्लॉस्ट हा सकाळी 10:00 वाजता पूर्वी आणि 17:00 वाजता नंतर करण्यात येवू नये.

10. ब्लॉस्टींग परिसरातील 25 मिटर पर्यत विद्युत फिटींगबाबत योग्य ती काळजी घ्यावी तसेच उपरोक्त परिसरातील 25 मिटर पर्यतच्या परिसरामध्ये इतरांना प्रवेश देवू नये.

11. विषयात नमुद जमीनीतून जाणारी विद्युत वाहीनी व पाण्याचे स्त्रोत व इतर पाईप लाईन असल्यास आवश्यक ती खबरदारी घ्यावी यासाठी संबंधीत विभागाचे ना–हरकत घेण्यात यावे.

22. This N.O.C. Valid for 06 Month.

23. The N.O.C. is applicable only when the applicant follows the rules and regulations imposed by the State and Central Govt. from time to time considering the Local Condition. The responsibility of cheeking adherence of these rules and regulations solely lies upon the applicant.

(पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे मान्यतेने)

(दीपक अग्रवाल)
पोलीस उपआयुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्त, नागपूर यांचेकरीता

प्रति,
मेसर्स माधव नेत्रालय आय इंस्टीटयूट ॲन्ड रिसर्च सेंन्टर

मार्फत :– वरीष्ठ पोलीस निरीक्षक, पो.स्टे. एम.आय.डी.सी, नागपूर

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीकरिता :–

1) पोलीस उपआयुक्त, परिमंडळ–1, नागपूर शहर

2) पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, नागपूर शहर.

3) वरीष्ठ पोलीस निरीक्षक, पो.स्टे. एम.आय.डी.सी, नागपूर

4) उप प्रमुख नियंत्रक, स्फोटक विभाग, मुख्य नियंत्रक चाचणी केन्द्र, गोंडखैरी, अमरावती रोड, नागपूर 440023.

5) उप अभियंता तथा अधिक्षक, सार्वजनिक बांधकाम विभाग, आमदार निवास, सिव्हील लाईन्स नागपूर